P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट

दिनांक – १९/०९/२०२४

## दि. १८/०९/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी १०७३/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१८/०९/२०२४ रोजी ०१.०० वा. ते ०१.१५ वा.चे सुमारास पाषाण एनडीए रोड ,तुषार बालवडकर यांची जागा,आयपीएस कॉलनी समोर बावधन या ठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दि.१८/०९/२०२४ रोजी ०८.२६ वा. |
| फिर्यादी | :- | मनोजकुमार नथनी महतो वय ३४ वर्ष धंदा. नर्सरी सध्या राहणार पाषाण एनडीए रोड तुषार बालवडकर यांची जागी आयपीएस कॉलनी समोर बावधन |
| आरोपी | :- | १. राजीवकुमार नथुनीप्रसाद सिंह, वय-३३ वर्षे, रा. मच्छाही, जि.मुझ्झपरनगर, बिहार २.धीरजकुमार रमोद सिंह, वय-२० वर्षे रा. सदर **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र १ व २ यांनी फिर्यादी यांचे गाववाला/ भागीदारी इसम नामे प्रविणकुमार भोला महतो वय २६ वर्ष मुळ गाव मषिही जि. मुझ्झपरनगर रा बिहार याचे व आरोपी क्र १ याची पत्नी हिचेशी असलेले अनैतीक संबंधांचे कारणावरून चिडून जावुन कोणत्यातरी धारदार हत्याराने त्याचा गळा चिरून हातावर पायावर, डोक्यावर, वार करून त्यास गंभीर जखमी करून जीवे ठार मारलेले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि फड ९०११०५१३५७ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड १०२१/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १०९, ३५२, ३५१(२),३(५)भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३,२५, २७ व महाराष्ट्र पोलीस अधि सन १९५१ चे कलम ३७(१) (३) सह १३५, क्रि.लॉ.अमेंडमेंट अ‍ॅक्ट ३,७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१७/०९/२०२४ रोजी १८/१० वा चे सुमारासगेट नं ७, मटेरियलगेट, फिनिक्स मॉल, शंकरकलाटेनगर, वाकड पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१८/०९/२०२४ रोजी ०४/१६ वा. |
| फिर्यादी | :- | अभिजीत अमृत राठोड वय १९ वर्षे धंदा लोडर, रा. रशिदवाडी, जांबे-पुनावळे, ता. मुळशी जि. पुणे |
| आरोपी | :- | १) बाळा शिंदे ऊर्फ अक्षय ऊर्फ बाला लहु शिंदे, वय ३० वर्षे, रा. राधाकृष्ण कॉलनी, माऊली चौक, वाकड, पुणे २) रणजीत नथुराम सरगर वय २५ वर्षे रा. मु.पो.मसुर ता.कराड जि. सातारा **आरोपी अटक आहेत** |
| तपशिल | :- | नमुद केले ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्रं १ हा फिनिक्स मॉलचे गेटजवळ येऊन ''तुम्ही येथे काम कसे करता, मी तुमच्याकडे बघुन घेतो, येथे काम केले तर एक एकाला गोळया घालतो मी इथलो भाई आहे''असे धमकावुन व शिवीगाळ करुन आज जर बुवा सापडला असता तर त्याला गोळया घातल्या असत्या, असे बोलुन त्याचे कमरेला लावलेले रिव्हॉल्वर काढुन फिर्यादी व साक्षीदार उभे असलेल्या दिशेला रिव्हॉल्वर रोखुन रिव्हॉल्वर मधुन फिर्यादी व साक्षीदार यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्यांचे दिशेने गोळीबार केला.फिर्यादी, साक्षीदार तसेच तेथे असलेले लोकांमध्ये दहशत निर्माण केली. गोळीबार करणारा आरोपी क्रं १ व त्यास कार मधुन पळुन जाण्यास मदत केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि गायकवाड ९५५२५४६१३१ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ६५९/२०२४ भा.न्या.सं.कलम १०९,३५१(२),३५२, १२५ क्रिमीनल अमेंडमेंट अँक्ट ३,७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१७/०९/२०२४ रोजी २३/०० वा. चे सुमारास मौजे चाकण गावचे हददीत महात्मा फुले नगर मधील आगरवाडी रोडचे पुलावर ता. खेड जि. पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१८/०९/२०२४ रोजी ०२.२० वा. |
| फिर्यादी | :- | अलोक राजेश पारवे, वय १७ वर्षे, व्यवसाय- शिक्षण, रा. महात्मा फुले नगर, चाकण ता. खेड जि. पुणे |
| आरोपी | :- | समीर राम जोगदंड रा. महात्मा फुले नगर, चाकण ता. खेड जि. पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख व ठिकाणी नमुद आरोपी याने फिर्यादीस रस्त्यात थांबवुन फिर्यादीस तु बॅनरची फ्रेम नेली आहे असा फिर्यादीवर संशय घेवुन फिर्यादीच्या शर्टची कॉलर पकडुन "मी तुला बोलतो आहे आणि तु पुढे चालला," याचा राग मनात धरून नमुद आरोपी याने फिर्यादीची कॉलर धरलेली म्हणुन फिर्यादीने आरोपीस बाजुला ढकलले त्यावेळी आरोपी फिर्यादीला म्हणाला की, "मी तुझ्याशी बोलत आहे आणि तु मला ढकलुन पुढे जातो काय मी इथला भाई आहे, तु माझ्या नादी लागला आहे. आता तुला जिवंत सोडत नाही" असे म्हणुन आरोपीने रस्त्याचे बाजुचे झोपडीचे दांडके काढले व "थांब आता तुला जिवेच मारून टाकतो" असे म्हणुन फिर्यादीला ठार मारण्याचे उददेशाने दांडक्याने फिर्यादीचे डोक्यात मारहाण केली. त्यावेळी फिर्यादीचा मित्र सनी गालफाडे याने आरोपीचे हातातील दांडके हिसकावुन घेण्यास गेला असता आरोपी याने त्याचे हातातील कडयाने सनीचे डोक्यात मारण्यास सुरूवात केली. फिर्यादीचे डोक्यात डाव्या बाजुला जखम होवुन रक्त येवु लागल्याने फिर्यादीहे तेथुन आरडा ओरडा करून घराकडे पळत निघाले असता नमुद आरोपीने सदर ठिकाणी मोठ मोठयाने आरडा ओरड करून मला शिवीगाळ दमदाटी केली, तसेच सदर परीसरात दहशत करून फिर्यादीचे दिशेने दगड फेक केली त्यावेळी त्यातील एक दगड फिर्यादीचे डावे हाताचे दंडावर लागला त्यावेळी आजु बाजुचे दुकानदारांनी भितीपोटी त्यांची दुकाने बंद केली लोकांनी घराचे दरवाजे बंद करून घेतले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि धायगुडे ९५९४९३०४२५ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी एमआयडीसी ४७८/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२),३१८(४),३३८,३३६(३),३४०(२), ३(५) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.११/०६/२०२४ रोजी ते दि.२५/०७/२०२४ रोजी दरम्यान फ्लॅट नं ७, आर.एच.-१४०, शाहूनगर, चिंचवड, पुणे. येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१८/०९/२०२४ रोजी १९.५३ वा. |
| फिर्यादी | :- | संजय हरिभाऊ शेटे, वयः-५१ वर्षे, व्यवसाय ट्रान्सपोर्ट व्यवसाय रा अर्पण को. ऑपरेटिव्ह सोसायटी, फ्लॅट नंः-७, आर.एच. १४०, शाहूनगर, चिंचवड, पुणे. मोबाईल क्र :-८९९९५६८८१७. |
| आरोपी | :- | १. संतोष भोसले, वय ३५ वर्षे अॅरेना फायनान्स कंपनीचा माणुस २. गणेश साहेबराव लांडगे, आयडीबीआय खाते क्र ०५६७१०४०००१६४३९९ धारक ३. गणेश गोविंद फडके, वय ४९ वर्षे, रा एएसएम, बिल्डींग नं - १८, फ्लॅट नंः-१०४, पुर्णानगर, चिंचवड, पुणे, **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना आरोपी क्र २ यांनी अॅरेना फायनान्स कपंनी कडून दहा कोटी रुपये लोन देण्याचे आमिष दाखवुन सदर लोनसाठी कंपनीचा प्रतिनिधी आरोपी क्र १ यास आयडीबीआय बँक, शिवाजीनगर शाखेचे चेक क्र १०५३१ अॅरेना फायनान्सच्या नावाने १५००/- रुपयांचा व चेक क्र १०५३२ रुपये ७००/- चा चेक दिले शाहूनगर येथे दिले होते. आरोपी यांनी चेक क्रमाक १०५३२ शाई खोडुन त्यावर खाडाखोड करुन तो चेक त्याने गोडोली, जि.सातारा शाखेच्या आयडीबीआय बँकेमध्ये वटवुन अकाउंट नं ०५६७१०४०००१६४३९९ वर एकूण २१,४५,०००/-रुपये ट्रान्सफर करुन घेतले, बेअरर चेक देवुन अकाउंटमधुन ९,००,०००/-रुपये काढुन घेतले तसेच ५०,०००/- रुपये व २५,०००/- रुपये एटीएममधुन काढुन फिर्यादीस कोणत्याही प्रकारचे लोन रक्कम न देता फिर्यादी एकुण ३१,२०,०००/- रुपयांची फसवणुक केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि पाठारे ८८८८८१०९५७ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड १०२०/२०२४ एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क) २०(ब)(ii)(अ), प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१७/०९/२०२४रोजी १९.०५ वा. आरके पॉलिमर इंडस्ट्रीज कोहिनुर बिल्डींग जवळ ताथवडे पुणेचे समोर येण्याजाण्याचे रोडवर |
| गुन्हा दाखल | :- | दि.१८/९/२०२४ रोजी ००.१८ वा. |
| फिर्यादी | :- | मोहमद गौस रफिकभाई नदाफ पोलीस हवालदार ११८६ गुन्हे शाखा युनिट ०४ पिपंरीचिंचवड |
| आरोपी | :- | करण युवराज बागुल वय २२ वर्षे रा. निमझरीनाका परिसर १५ जयहिंद कॉलनीशिरपुर जि धुळे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने त्याचे कब्जात एकुण १९,८००/- रु. किं. चा ३९६ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या विक्री करीता कब्जात बाळगताना मिळुन आला. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि साळुंखे ९८२२७८४००४ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | म्हाळुंगे एमआयडीसी ६३६/२०२४ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क),२०(ब) (ii)(C), प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. १८/०९/२०२४ रोजी १७.३० वा.चे म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीतील म्हाळुंगे इंगळे येथील एमआयडीसी कंमानीजवळ |
| गुन्हा दाखल | :- | दि.१८/९/२०२४ रोजी २३.१६ वा. |
| फिर्यादी | :- | राहुल हरीश्चंद्र सुर्यवंशी वय ३० वर्षे, पोलीस शिपाई, ब. नं. २७१८, गुन्हे शाखा, युनिट ३ पिंपरी - चिंचवड पो आयुक्तालय, |
| आरोपी | :- | **विधीसंघर्षीत बालक ताब्यात आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने त्याचे कब्जात एकुण ४,९३,०००/- रु. किं. चा ९.८६० किलोग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या विक्रीकरीता कब्जात बाळगताना मिळुन आला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि काळे ९२८४१८५५२३ |